**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक ०८ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली उद्या नवीन सरकारच्या शपथविधीसाठी राजधानी दिल्ली सज्ज.**
- **काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या बैठकीत राहुल गांधी विरोधी पक्ष नेता म्हणून ठराव आज मंजूर.**
- **खरीप हंगामात बियाणं आणि खतांच्या योग्य वितरणासाठी कृती दल निर्माण करण्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश.**
- **विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात तापमान ४०अंशाच्या वर, ढगाळ वातावरणामुळे उकाड्यात वाढ तर १२ जून पर्यंत वादळी पर्जन्यमान.**

*****

शपथविधी समारंभ

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या नवीन सरकारचा शपथविधी समारंभ उद्या म्हणजे रविवारी संध्याकाळी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं होणार आहे. राष्ट्रपती संध्याकाळी सव्वासात वाजता नरेंद्र मोदी आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील. भारताचे शेजारी देश आणि इतर मित्रदेशांचे प्रमुख या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. उद्या होणाऱ्या शपथविधी समारंभाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी तिथली सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. याअंतर्गत नवी दिल्लीत कोणत्याही प्रकारचे ड्रोन, पॅराग्लायडर्स, हवाई तरंगते ग्लायडर्स किंवा अशा प्रकारची उपकरणं हवेत उडवायला बंदी केली आहे. ही बंदी उद्या म्हणजे नऊ तारखेसाठी असली तरी दहा तारखेला देखील ती कायम असेल, असं दिल्ली पोलिसांनी कळवलं आहे. दरम्यान, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना आणि मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्यासह शेजारील आणि सात हिंद महासागर क्षेत्रातील देशांचे नेते 9 जून रोजी होणाऱ्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने शनिवारी एका निवेदनात ही माहिती दिली आहे. मोदींच्या

शपथविधी समारंभाला उपस्थित राहण्यासाठी या नेत्यांची भेट भारताने "नेबरहुड फर्स्ट" धोरणाचा भाग म्हणून हाती घेतली आहे, असंही निवेदनात म्हटले आहे.

राहुल गांधी विरोधी पक्षनेता

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेता बनवण्याच्या प्रस्तावाला आज, शनिवारी मंजुरी देण्यात आली. आज नवी दिल्लीत काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सीडब्लुसीच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेला संबोधित करताना, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के.सी. वेणुगोपाल यांनी याप्रसंगी सांगितल कि, आता काँग्रेस पक्षाचे पुनरुज्जीवन सुरू झाले आहे. काँग्रेस कार्यकारिणीने एकमताने राहुल गांधींना लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद स्वीकारण्याची विनंती केली आहे. राहुल गांधींचे नेतृत्व एक मजबूत आणि जागृत विरोधी पक्ष तयार करेल. तर राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आणि देशातील जनतेचा आवाज व्हावे ही आमच्या कार्यकारिणीची इच्छा आहे. त्यांच्या जोरावर त्यांना सत्य जनतेसमोर आणण्याचे बळ मिळेल असा विश्वास नाना पटोलेंनी व्यक्त केला.तत्पूर्वी, विस्तारित काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत उद्घाटनपर भाषणात काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही निवडणूक लढवून जिंकलेल्या काँग्रेसच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, मणिपूरमध्ये, जिथून काँग्रेसने न्याय यात्रा सुरू केली, दोन्ही जागा जिंकल्या आणि नागालँड, आसाम, मेघालयमध्येही जागा मिळाल्या. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी काँग्रेस पक्षाला देशभरातून जनतेचा मोठा पाठिंबा मिळाला. I.N.D.I.A. ब्लॉक भागीदारांसह पक्ष संसदेत आणि संसदेबाहेर एकजुटीने आणि एकत्र काम करेल, असे खरगे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी  आणि पक्षाचे इतर नेते उपस्थित होते.

नाना पटोले

राज्यातील जनतेला दुष्काळाचे चटके बसत आहे. सरकारचे दुष्काळाकडे होत असलेले दुर्लक्ष पाहता राज्यपाल महोदयांनी या प्रश्नी लक्ष घालून जनतेला मदत देण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेतकऱ्यांची अवस्था पाहता कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रुपये, बागायती शेतीला एकरी ५० हजार रुपये तसेच फळबागांना एकरी १ लाख रुपये मदत तातडीने द्यावी. जनावरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्यात व पिण्याच्या पाण्याची सोय करावी. खरीपाच्या पेरणीसाठी खते आणि बियाणे सरकारने पुरवावे अशी मागणी करत दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारला निर्देश द्यावेत अशी मागणी महामहिम राज्यपाल यांच्याकडे केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

प्रकाश आंबेडकर

इंडी आघाडीला संसदेमध्ये स्वतंत्र बहुजनांचे नेतृत्वच नको होते. त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांचा वापर केला आणि आमचे तत्वज्ञान हायजॅक केले, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी समाजमाध्यमांद्वारे केली आहे. या निवडणूक प्रक्रियेत, बहुजनांनी स्वत:चे स्वतंत्र राजकीय नेतृत्व उभे करण्याची आणि त्यांना संसदेत पाठवण्याची संधी गमावली आहे. आमचा लढा नेहमीच संविधान वाचविण्यासाठी राहिला आहे. किंबहुना हेच आमचे तत्वज्ञान आणि विचारधारा असून, आगामी काळात आम्ही मोठ्या ताकदीने आणि विश्वासाने जनतेच्या पाठिंब्यावर भरारी घेऊ, पुनरागमन करू, असा विश्वास आंबेडकरांनि व्यक्त केला आहे.

अमित शाह बैठक

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज संध्याकाळी दिल्लीत महाराष्ट्रातल्या युतीच्या नेत्यांशी चर्चा करणार आहेत. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी होईपर्यंत राजीनामा स्थगित करण्यास सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीत रालोआला महाराष्ट्रात अपेक्षित जागा न मिळाल्याची जबाबदारी घेत देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा

राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वर्षा शासकीय निवासस्थानी होणारी रालोआ मित्रपक्षांचे नेते आणि नवनिर्वाचित खासदारांची बैठक रद्द केली आहे. अमित शहा रालोआच्या नेत्यांना काय मार्गदर्शक सूचना देतात यासाठीची उत्सुकता वाढली आहे.

धनंजय मुंडे

राज्यात यंदा खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरने वाढ झाली असून बियाण्यांच्या आणि खतांच्या पुरवठ्याबाबत सूक्ष्म नियोजन केलं जात आहे. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी ही माहिती दिली. ते काल मंत्रालयात खरीप हंगाम पूर्व तयारीच्या अनुषंगानं खतं, बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत आयोजित आढावा बैठकीत बोलत होते. सध्याची एकूण बियाणे मागणी १८ लाख क्विंटल इतकी आहे. वाढलेल्या क्षेत्राचा विचार करून राज्य शासनानं २४ लाख क्विंटल बियाणं मंजूर केलं आहे. त्यापैकी १३ लाख क्विंटल वितरीत केलं असून आणखी ६ लाख क्विंटल वितरणाच्या प्रक्रियेत आहे. उर्वरित बियाणंदेखील वेळेत वितरीत होईल, असं नियोजन केलं जात असल्याचं मुंडे यांनी सांगितलं. सर्व प्रकारचं बियाणं शेतकऱ्यांना योग्य भावात मिळावं, तसंच खतांचा मुबलक साठा आणि त्याचं योग्य वितरण व्हावं, यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

राज्यपाल रमेश बैस

विसाव्या शतकात शोध लागलेली प्लास्टिक बहुगुणी वस्तू असून आज दैनंदिन जीवनापासून अनेक क्षेत्रांत प्लास्टिकचा वापर अनिवार्य झाला आहे. भारतीय प्लास्टिक उद्योगाने जगातील अनेक बाजारपेठा काबीज केल्या असून या उद्योगाने संशोधन, नाविन्यता व उत्कृष्टतेच्या माध्यमातून 'ब्रँड इंडिया' निर्माण करावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबई इथं केले. भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या प्लास्टिक निर्यात

प्रोत्साहन परिषदेतर्फे देण्यात येणारे 'प्लास्टिक निर्यात उत्कृष्टता पुरस्कार' राज्यपाल बैस यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

विनय गौडा

शासन निर्णय 2023 च्या अन्वये तलाठी संवर्गाची आस्थापना जिल्हास्तरावर निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुसरून तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या संगणकीय ऑनलाइन पद्धतीने करण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यासाठी राज्यस्तरीय अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली असून या अभ्यास गटात चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा समावेश शासनाने केला आहे. याबाबतचा शासन आदेश 7 जून 2024 रोजी निर्गमित करण्यात आला.

गोवरी सेंट्रल परियोजना

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या विशेष पुढाकाराने अखेर वेकोलि बल्लारपूर क्षेत्रांतील गत 3 वर्षांपासून प्रस्तावित असलेल्या गोवरी सेंट्रल परियोजनेकरीता लवकरच सेक्शन 4 ची अधिसुचना जारी होत असून या प्रलंबित परियोजनेचा मार्ग प्रकल्पाचा कॉस्ट प्लस खरेदीदार करारनामा होवून मोकळा झाल्यानं प्रकल्पग्रस्तांमध्ये आनंद व्यक्त होत आहे त्यांनी हंसराज अहीर यांच्या योगदानाबद्दल विशेष आभार मानले आहे. रवीभवन नागपूर इथं तसेच जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर येथे मार्च 2024 रोजी घेतलेल्या एनसीबीसीच्या सुनावणीत व यापूर्वी वेकोलि मुख्यालय नागपूर येथे झालेल्या बैठकीत या प्रकरणी तातडीने कार्यवाहीचे निर्देश जारी केले होते.

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात येत्या 12 तारखेपर्यंत वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. यादरम्यान सोसाट्याचा वारा आणि विजांच्या

कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली असून सतर्क राहण्याचा इशारा देखील जारी केलाआहे. दरम्यान गेल्या 24 तासात विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं 42.6 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. अमरावती पाठोपाठ अकोला येथे 41 अंश, चंद्रपूर इथं 41.2 तर गोंदिया इथं 41.6 इतकं तापमान नोंदवण्यात आलं. नागपुर इथं 40.7 इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरित जिल्ह्यांपैकी गडचिरोली, वाशिम, बुलढाणा आणि भंडारा या ठिकाणी तापमान 38 ते 40 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. अधून मधून ढगाळ वातावरण असल्याने प्रचार उकाडा जाणवत आहे. दरम्यान, पुढल्या एका तासात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा आणि अमरावती, यवतमाळ येथे सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची श्यक्य आहे.

कार्यशाळा

नंदनवन स्थित महिला महाविद्यालय, नागपूर इथं नुकतीच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विषयांची निवड या विषयावर इंटरनल क्वालिटी अशुरंस सेल आणि इंग्रजी विभागाद्वारे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.प्रवीण भागडीकर, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर यांना आमंत्रित करण्यात आलं. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.वंदना भागडीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलं. कार्यशाळेचे प्रमुख वक्ते डॉ.प्रवीण भागडीकर यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विषयांची निवड या विषयावर उपस्थित प्राध्यापकांना मार्गदर्शन केलं. विद्यार्थी महाविद्यालयात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी विषयाची निवड कशी करावी तसेच प्रवेश समितीने विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारचा सल्ला द्यावा हे अतिशय सोप्या शब्दात आणि सुलभ पद्धतीने मार्गदर्शन केलं.

*****